**नियमित दिवाणी दावा क्र. ५८/२०१४ मधील**

**निशाण ९६ वरील आदेश**

**CNR No. MHRT050005522014**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी त्यांच्याविरूध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करून मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

०२. अर्जातील कथनाप्रमाणे आवश्यक ती माहिती व कागदपत्रांअभावी वादी यांना सरतपासाचे प्रतिज्ञापत्र वेळेत दाखल करणे अशक्य झाले असल्याने त्यांना मुदतीत त्यांच्यावतीने पुरावा दाखल करता आलेला नाही. वादी यांना त्यांच्यावतीने योग्य व आवश्यक पुरावा देणेचा आहे. परंतु न्यायालयाने त्यांचेविरूध्द पुरावा नाहीचा आदेश करून त्यांचा पुरावा देण्याचा हक्क संपुष्टात आणलेला आहे. वादी यांना पुरावा देणेची संधी न मिळल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे व त्याच्या दाव्यावर विपरित परिणाम होणार आहे. त्यामुळे त्यांचेविरूध्द झालेला 'पुरावा बंद' चा आदेश रद्द होणेकरिता सदरचा अर्ज त्यांनी दाखल केलेला आहे.

०३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी यांचे म्हणणे मागविणेत आले. प्रस्तुतचे कामी वादी यांना पुरावा देणेस पुरेशी संधी दिली असुन हरकत आहे असे म्हणणे त्यांनी दाखल केले आहे.

०४. अर्ज, म्हणणे व प्रकरणाचा अभिलेख पाहिला, त्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

०५. वादीने प्रस्तुतचा दावा हा दि.१२/०९/१९८५ रोजीचे खरेदीखताने दावा मिळकतींचा मालक झालेला आहे असे घोषित करून मिळणेस तसेच निरंतर ताकीदीकरिता दाखल केला आहे. प्रस्तुत कामी दि.०८/१२/२०२३ रोजी मुद्दे निश्चित केले असुन तदनंतर सदरचे प्रकरण वादी यांचा पुराव्यावर प्रलंबित होते.

दि.२६/०९/२०२४ अखेर वादी यांनी पुरावा न दिल्याने त्यांचेविरूध्द पुरावा बंदचा आदेश पारित केला आहे.

०६. वादी यांना आवश्यक ती माहिती व कागदपत्रांअभावी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र वेळेत दाखल करणे शक्य झाले नसल्याचे वादीचे कथन आहे. वादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी दिल्यास त्यांची बाजु पटलावर येणार आहे व सदरचा दावा हा नैसर्गिक न्यायतत्वानुसार निकाली होण्यास मदत होणार आहे. वादी यांना त्यांचा पुरावा दाखल करण्याची संधी न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही.

०७. दाव्याचे स्वरूप, त्यातील मागणी पाहता वादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे उचित ठरणारे आहे असे मला वाटते. परंतु असे जरी असले तरी त्यांनी पुरावा देणेस केलेला विलंब हा नजरेआड करता येणार नाही. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेल्या विलंबाबत योग्य ती कॉस्ट करणे न्याय उचित होईल असे मला वाटते, सबब मी खालील आदेश पारित करते,

**आदेश**

१. अर्ज (नि.९६) मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांचेविरुध्द झालेला 'पुरावा बंद' चा आदेश रक्कम रू.२००/- ही प्रतिवादीस कॉस्ट देण्याच्या अटीवर रद्द करणेत येतो.

३. वादी यांनी कॉस्टची रक्कम रू.२००/- ही प्रतिवादी यांना पुढील तारखेला द्यावी.

Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2024.12.13 17:39:32 +0530

**दिनांक- १३/१२/२०२४**

**(मनिषा म. पाटील)**
**२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खेड,**
**ता. खेड, जि. रत्नागिरी**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No.58-2014 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original order. | | |
| Name of Stenographer | : | Smt. S.K.Kharat |
| Court Name | : | 2nd Jt. CJJD & JMFC Court, Khed |
| Date of Decision | : | 13.12.2024 |
| Order signed by Presiding Officer on | : | 13.12.2024 |
| Order uploaded on | : | 13.12.2024 |